परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय क्र. 5 – मुंबई
द्वितीय सत्रांत परीक्षा २०२३-२४

इयत्ता ९ वी — विषय- मराठी (द्वितीय भाषा)

वेळ : १¹/₂ तास — एकूण गुण – ४०

## विभाग – "अ" – वाचन व आकलन

**प्रश्न १ खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जन्मापासून आतापर्यंत माणसाची धाव सुखासाठी असते. सुख मिळवण्यासाठी आपण वणवण करीत असतो. अमृतघट म्हणजे सुख समाधान. या सुखाचे धडे माणसाच्या घरात भरुन राहिले आहेत; पण 'तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी' अशी त्याची अवस्था झाली आहे.

आपल्याला प्रेमाने जवळ येणाऱ्याप वासराची ओढ त्याला कळत नाही. कुत्र्या मांजरांच्या पिल्लांमध्ये स्वत:ची मुलगी रमते, हे प्रेम त्याला समजत नाही. पोथी वाचणारे वडील, वाती वळणारी आई यांची भक्ती त्याला उमगत नाही. खरे सुख-समाधान घरात, घरातल्या मुलामाणसात, प्राणिमात्रात आहे; हे सांगण्यासाठी कवीने अमृतघट हे शब्द वापरले आहेत.

यात्रेकरु आणि कस्तुरीमृग अडाणीपणाने वागतात. देव सर्वात आहे, या जगात ईश्वर सर्वत्र भरुन राहिला आहे; एवढेच नव्हे तर आपल्या ह्दयात देव आहे असे असताना यात्रेकरु देवाला भेटण्यासाठी तीर्थयात्रा करतात. कस्तुरीमृगाची स्थिती तशीच आहे; त्या विशिष्ट जातीच्या हरणाच्या बेंबीत कस्तुरी असते आणि तिचा सुगंध आमसंतात दरवळत असतो. मजा म्हणजे हा सुंगध कुठून येतोय ते शोधण्यासाठी कस्तुरीमृग इतस्तत: सैरावैरा धावत असतात.

असे असले तरी या यात्रेकरुंना किंवा कस्तुरीमृगाला हसण्याचे कारण नाही. स्वत:ला शहाणा समजणारा माणूस तरी काय करतो? घरात सुखाचे रांजण भरलेले असूनही सुखाच्या शोधासाठी वणवण भटकत असतो. त्याला इतरांना हसण्याचा काय अधिकार?

**प्रश्न.१ अ) उतारा वाचून त्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यांयांमधून निवडा. (३ x १ = ३)**

१. खरे सुख समाधान घरात, घरातल्या मुलामाणसांत, प्राणिमात्रात आहे हे सांगण्यासाठी कवीने कोणते शब्द वापरले आहेत ?
१) कस्तुरीमृग २) कस्तुरीचा सुगंध ३) देव सर्वांठायी वसे ४) अमृतघट

२. पुढील वाक्य पूर्ण करा. – तुझे आहे तुजपाशी ..........................
१) जाशील देवापाशी २) तरी तू गेला देवापाशी
३) तरी तू गेला यात्रेसाठी ४) परी तू जागा चुकलासी

३. आई वडिलांजवळ थांबण्यात, त्यांच्याशी बोलण्यात काय मिळते ?
१) दु:ख मिळते २) पैसे मिळतात ३) समाधान मिळते ४) खेळण्यास मिळते

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. (३ x १ = ३)**

१. घरात सुखाचे रांजण भरलेले असूनही सुखाच्या शोधासाठी माणूस काय करतो?

२. अमृतघट म्हणजे काय?

३. अडाणीपणे कोण वागतात?

**क) थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही एक) (२ x १ = २)**

१. सुख-समाधान घरातच आहे सांगण्यासाठी उताऱ्यातील दोन उदाहरणे लिहा.

२. यात्रेकरु व कस्तुरीमृगाची उदाहरणे देण्यामागचा लेखकाचा उद्देश काय आहे?

**विभाग - "ब" - व्याकरण**

**प्रश्न.२ अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ४) (४ x १ = ४)**

१. <u>शेवंता</u> ही माझ्या आईची बहीण आहे. (अधोरेखित शब्दाचा नामाचा प्रकार ओळखा)

१) सामान्य नाम २) विशेषनाम ३) भाववाचक नाम ४) विशेषण

२. माझे आजोबा हळूहळू चालतात. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा.)

१) माझे २) हळूहळू ३) चालतात ४) आजोबा

३. 'प्रामाणिकपणा' हा नामाचा कोणता प्रकार आहे?

१) विशेषनाम २) भाववाचक नाम ३) सामान्य नाम ४) सर्वनाम

४. तू सिनेमाला येतोस की घरी जातोस? (उभयान्वयी अव्यय ओळखा)

१) तू २) सिनेमाला ३) की४) घरी

५. मी नेहमी मंदिरात जातो. (क्रियापद ओळखा)

१) मी २) नेहमी ३) जातो ४) मंदिरात

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. बाबांनी वर्तमानपत्र वाचले. (वाक्याचा काळ ओळखा)

२. मोत्या शेपटी हलवनू नमस्कार करतो. (भविष्यकाळातील वाक्य बनवा)

३. भरत गोष्ट सांगेल. (वाक्याचा काळा ओळखा)

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. देवा मला पास कर ! (वाक्याचा प्रकार ओळखा)

२. माझे घर शाळेजवळ आहे. (वाक्याचा प्रकार ओळखा)

३. तू शाळेत का जात नाहीत? (वाक्याचा प्रकार ओळखा)

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?
१) त्रिदल २) चार्तुमास ३) आजन्म ४) पंचारती

२. खालील शब्दाचा समास ओळखा.
गैरहजर
१) वैकल्पिक द्वंद्व २) इतरेतर द्वंद्व ३) द्विगू ४) अव्ययीभाव

३. खालील शब्दाचा समास ओळखा.
पापपुण्य
१) द्विगू २) अव्ययीभाव ३) वैकल्पिक द्वंद्व ४) इतरेतर द्वंद्व

**प्रश्न.३ अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?
१) पाणी - पर्ण २) अरण्य-रस्ता ३) दिन - दिवस ४) युक्ती - युवती

२. गटात न बसणारा शब्द कोणता?
१) अचंबा २) आश्चर्य ३) फूल ४) नवल

३. गटात न बसणारा शब्द कोणता?
१) फूल २) पुष्प ३) सुमन ४) समीर

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. विरुध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती?
१) चूक x बरोबर २) मागे x जवळ ३) मूर्ख x अमूर्ख ४) मोठा x महान

२. 'मित्र' या शब्दाचा विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.
१) सखा २) भाऊ ३) शत्रू ४) सवंगडी

३. 'आनंद' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द लिहा.
१) हर्ष२) मोद ३) दु:ख ४) स्वस्थ

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. एकवचनी शब्द ओळखा.
पक्षी, मन, नजर, महिना

२. इमारत या शब्दाचा अनेकवचनाचा शब्द लिहा.

३. वाट या शब्दाचा अनेकवचनाचा शब्द लिहा.

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता?
१) गृहस्थ २) गृहिणी ३) चेंडू ४) माणूस

२. लिंग बदला.
काका

३. पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द कोणता?
१) बांगडी २) वही ३) पृथ्वी ४) घोडा

**विभाग - "क" - पाठ्यपुस्तकावर आधारित**

**प्रश्न.४ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. लेखकाला कशाचा राग आला?
२. शिरीष बरोबर कोण होते?
३. लोकांना कोणती कल्पना अचंब्याची वाटली?
४. किती वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली?

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. (कोणतेही तीन) (३ x १ = २)**

१. दहा डब्यांची ............... खुशाल चालली आहे.
१) माळका २) माळ ३) मालिका ४) शृंखला
२. तेवढ्यानेही कोणाचे ............. होईना.
१) समाधान २) कौतुक ३) दु:ख ४) नवल
३. नियमितपणे रोज ........... जोडी येऊ लागली.
१) मातापित्याची २) पितापुत्राची ३) काकापुतण्याची ४) दादामामाची
४. नंतर जन्मात हात लावणार नाही ................
१) व्हायोलिनला २) गिटारला ३) विणेला ४) तबल्याला

**क) थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही एक) (१ x २ = २)**

१. शिरीषची स्वभाव वैशिष्ट्ये लिहा.
२. रेल्वेप्रवासाचे फायदे-तोटे लिहा.

**प्रश्न.५ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. संत बहिणाबाईंनी भजन कसे करण्यास सांगितले आहे?
२. संत बहिणाबाईंचे गुरु कोण?
३. वैरी कोणाला मानले आहे?
४. व्यायामामुळे स्नायू कसे होतात?

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. (कोणतेही तीन) (३ x १ = ३)**

१. संतकृपा झाली । इमारत ........... आली ।।
१) मुळा २) कळा ३) फळा ४) माळा
२. तुका झालासे ........... भजन करा सावकाश ।।
१) शिखर २) माथा ३) कळस ४) गाभा
३. व्यामामहीना पित्त ............, वायु । जर्जर करिती अत्यंत ।।
१) सर्दी २) पडसे ३) ज्वर ४) कफ
४. व्यायाम वाढे प्रतिकार शक्ति । .............. प्रवृत्ति ।
१) परावलंबनाची २) स्वावलंबनाची ३) रोगराईची ४) आजाराची

**क) संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही एक) (१ x २ = २)**

१. ज्ञानदेवें रचिला पाया ।
उभारिलें देवालया ।।२।।

२. व्यायामाविण सात्त्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
व्यायामे होय अग्निदीपन । अन्नपचन सहजचि ।

* समाप्त *